## <u>दिनांक २१.०७.२००९ रोजी संपन्न झालेल्या सभेचे जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे कार्यवृत्त</u>

जिल्हा उद्योग मित्र समितीची सभा मा. अप्पर जिल्हाधिकारी, अकोला यांचे अध्यक्षतेखाली सभा दिनांक २१.०७.२००९ रोजी दुपारी ४.०० वाजता संपन्न झाली. सर्वप्रथम महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, अकोला यांनी मा. जिल्हाधिकारी, अकोला यांचे व उपस्थितांचे स्वागत करून मा. अध्यक्ष महोदयांचे परवाागीने सभेस सुरूवात केली. व सर्वप्रथम अकोला जिल्हातील औद्योगिक विकासाबाबत सविस्तर माहिती सभागृहात सादर केली. सभेत खालील विषयावर चर्चा करण्यात आली.

अ - दिनांक ०८.०४.२००९ रोजी संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समितीची सभेच्या कार्यवृतास सर्वानूमते मंजूरी प्रदान करण्यात आली

ब - दिनांक ०८.०४.२००९ रोजी झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेच्या कार्यवाही मुद्यावर चर्चा.

### <u>प्रलंबीत मुद्ये.</u>

**<u>कार्यवाही</u> - १. <u>ट्रान्सपोर्ट नगर.</u>**
**<u>मऔविमं.</u>**

ट्रान्सपोर्ट मध्ये एमआयडीसी मार्फत सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तरी ट्रान्सपोर्टर ट्रान्सपोर्ट नगरमध्ये जात नाही. याकरीता जिल्हास्तरावर एमआयडीसी तर्फे मा. जिल्हाधिकारी महोदय यांचे अध्यक्षते खाली विशेष सभा बोलविण्यात यावी त्यामध्ये राज्यस्तरीय सभेमध्ये घालेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यांत यावी.

**<u>कार्यवाही - २.</u> <u>मऔविमं.अकोला क्षेत्रातील (अप्पू चौक,लक्ष्मी वे ब्रीजपरीसरातील)</u>**
**<u>पोलीस विभाग.</u> <u>अतिक्रमण</u>**

मऔविमं. अकोला क्षेत्रातील अप्पूचौक, ते लक्ष्मी वे ब्रीज परीसरातील अतिकमण काढण्याची कार्यवाही दिनांक १९/०५/२००९ रोजी करण्यांत आली असे पोलीस विभागाकडून सभेत सांगण्यांत आले. **<u>विषय बंद</u>**

**कार्यवाही - ३.** **मुर्तीजापुर औद्योगिक क्षेत्रात स्वतंत्र फिडर बाबत-**
**मराविविकं./मऔविमं.**

मुर्तीजापुर औद्योगिक क्षेत्रात 11 KV चे स्वतंत्र फिडरच्या उभारणीचे व कार्यान्वीत करण्याचे काम पूर्ण झाले असून, फक्त लोड कनेक्शनचे काम बाकी आहे. तसेच विद्यूत निरीक्षक व रेल्वे विभगाची नाहरकत प्राप्त झाली आहे. असे कार्यकारी अभियंता मराविविकं. ग्रामीण यांनी मागील सभेत सांगीतले होते. यावर पुढील सभेपर्यंत सदर मुद्दा निकाली काढावा असे मा. अध्यक्षांनी मागील सभेत संबंधितास निर्देश दिले होते. परंतू सदर सभेस संबंधित अधिकारी सभेस हजर नसल्याने सदर मुदयावर चर्चा होवू शकली नाही.

**कार्यवाही - ४.** **मऔविमं. क्षेत्रात वाढते चोरीचे प्रमाण -**
**पोलीस विभाग**

अकोला औद्योगिक क्षेत्रात पोलीस चौकी नसल्याने, या क्षेत्रात पोलीस गस्त सुरू करण्यांत यावी. असे मा. अध्यक्षांनी संबंधितास सुचना दिल्या.

**कार्यवाही - ५.** **फेज ४ एमआयडीसी मध्ये 11 K.V. नेटवर्क करण्याबाबत**.
**म.रा.वि.वि.क. /मऔविमं.**

उद्योजकांना भुखंड वितरीत केल्यानंतर उद्योजकांचे मागणी नुसार 11 KV चे जाळे तयार करण्यासंदर्भात निवीदा दिल्या असून, येत्या १५ दिवसात निवीदाबाबतची कार्यवाही पूर्ण ऑगस्ट -२००९ अखेर पूर्ण करण्यात येईल असे मऔविमं. अधिका-यांनी सभेत सांगीतले.

**कार्यवाही - ६.** **फेज ४ एमआयडीसी क्षेत्रात 33 K.V. चे सब-स्टेशन बाबत**.
**म.रा.वि.वि.क. /मऔविमं.**

फेज ४ एमआयडीसी क्षेत्रात अस्तितवात असलेली **11 K.V.** ची लाईन पूर्णतः वापरत असल्याने भविष्यात मागणी लक्षात घेवून त्या क्षेत्रात **33 K.V**.चे सब-स्टेशन आवश्यक आहे. याकरीता म.रा.वि.वि.क. चे अधिका-यांनी मऔविमं. यांना ४ महिन्यापुर्वी प्रस्ताव सादर केलेला असून, सदर प्रकरण मऔविमं.च्या मुंबई मुख्यालयाकडे प्रलंबीत असून, सदर मुद्दा राज्यस्तरीय समितीला पुढील कार्यवाहीकरीता सादर करण्याच्या मा. अध्यक्षांनी संबंधितांना सुचना दिल्या.

**कार्यवाही -७. फेज ४ औद्योगिक क्षेत्रातील भुखंडधारकांना ३१-१२-०९ पर्यत**
**मऔविमं.** **मुदतवाढविण्याबाबत**

हयाबाबत मऔविमं. मुख्यालयाकडून सुचना प्राप्त झाल्या असून, मुदतवाढ देता येणार नाही असे प्रादेशिक अधिकारी, मऔविमं. अमरावती यांनी सभेत सांगीतले. यावर मा. अध्यक्षांनी सदर मुद्दा वगळण्यात यावा. असे मा. अध्यक्षांनी संबंधितांना सुचना दिल्या.

**विषय बंद.**

**<u>कार्यवाही</u> -८. मऔविमं. क्षेत्रात होणा-या पाणी पुरवठयातील अनियमीतता व नियोजनाबाबत.**
**<u>मऔविमं.</u>**

अकोला औद्योगिक क्षेत्रात पाणी पुरवठा नियमीत होत नाही याबाबत सविस्तर चर्चा करण्याकरीता जिल्हयातील GSDA, MGP, & Irrigation Deptt यांच्या सोबत स्वतंत्र सभा घेण्यांत यावी असे मा. अध्यक्षांनी संबंधितांना सुचना दिल्या. तसेच AGC MIDC-IV मध्ये असलेल्या नाल्यावर चेक डॅम करण्याबाबत VCC संघटनेने सभेत प्रस्ताव सादर केला. यावर अधिक्षकीय कृषी अधिका-यांसोबत चर्चा करण्यांबाबत मा. अध्यक्षांनी संबंधितांना सुचना दिल्या.

**<u>कार्यवाही</u> -९. ग्रोथ सेंटर ते शिवनी -शिवापुर गुडस् शेड मधील अप्रोच रोडबाबत.**
**<u>मऔविमं.</u>**

ग्रोथ सेंटर ते शिवनी -शिवनी शेड मधील अप्रोच रोड बनविण्याबाबतचा प्रस्ताव मऔविमं.च्या मुंबई मुख्यालयाकडे डिसेंबर-२००८ पासून प्रलंबीत आहे. असे मऔविमं. अधिका-यांनी सभेत सांगीतले. यावर हयाबाबत पाठपुरावा करण्याच्या मा. अध्यक्षांनी संबंधितांना सुचना दिल्या.

**<u>कार्यवाही</u> -१०. <u>मऔविमं क्षेत्रातील उद्योजकांना मनपाच्या जकात विभागाचे प्रतिनिधी कडून</u>**
**<u>मनपां.</u> <u>मारहाण.</u>**

अकोला महानगर पालीकेकडून पे-रोलवर असलेल्या जकात कर्मचा-याची यादी औद्योगिक संघटनेस देण्यात आली असून, संबंधित कर्मचा-यांना बॅच, आय कार्ड, युनिफार्म देण्यांत आलेले आहे. असे मनपा अधिका-यांनी सभेत सांगीतले. **<u>विषय बंद.</u>**

**<u>कार्यवाही</u> -११. <u>सामुहीक प्रोत्साहन योजना - २००१ बाबत.</u>**
**<u>जिउके</u>**

हयाबाबत उद्योग संचालनालय, मुंबई यांचे कडून अकोला इंडस्ट्रीज असो.चे तत्कालीन अध्यक्ष श्री. कैलास खंडेलवाल यांना सदर प्रकरणात धोरणात्मक निर्णयामुळे मुदतवाढ देता येणार नाही असे कळविण्यात आले आले आहे. यावर मा. अध्यक्षांनी सदर मुद्दा वगळण्यांत यावा असे निर्देश दिले. **<u>विषय बंद.</u>**

**कार्यवाही - १२. मे. अक्षय केमिकल्स या घटकाच्या पुर्नवसनाबाबत.**
**SBI, OLD CITY.**

मे. अक्षय केमिकल्स या घटकाचा उद्योग पुर्नवसनाबाबतचा प्रस्ताव मागील सभेत सर्वानुमते ठरल्याप्रमाणे उद्योग संचालनालय मुंबई व दि. १६-०४-०९ रोजी राज्यस्तरीाय SLIIC, सभा मुंबई येथे कार्यवाहीसाठी सादर करण्यांत आला होता. परंतू सदर मुद्दा जिल्हास्तरावर उद्योग मित्र समिती सभेतच बँकेसोबत समन्वय साधून निर्णय घेण्यात यावा असे उद्योग संचालनालयाचे दिनांक २९/०६/२००९ चे पत्रानुसार सुचविले आहे. यावर सदर मुद्दा स्टैट बँकेच्या SME Nagpur Branch ला पाठविण्यांत यावा असे मा. अध्यक्षांनी सभेत निर्देश दिले.

## नवीन मुद्दे

**कार्यवाही -१. आकोट औद्योगिक संघटनेने एमआयडीसी आकोट येथील विविध समस्या.**
**मऔविमं.**

आकोट औद्योगिक संघटनेने एमआयडीसी आकोट येथील विविध समस्ये बाबत खालील प्रमाणे निवेदन सादर केले आहे.

१- एमआयडीसी अंतर्गत रस्ते दुरूस्ती करणे
२- आकोट अकोला मुख्य रस्ता एमआयडीसीला जोडणारा असून त्याच्या दोन्ही बाजूला अनियमीतता झाली असून दोन्ही बाजूला मुरूम टाकणे.
३- एमआयडीसी अंतर्गत पथदिवे दुरूस्ती करणे व पथदिव्यावे देखभाल व निगा राखण्याचे काम स्थानिक कत्रांटदाराकडे देण्यात यावे.
४- एमआयडीसी अंतर्गत पाणी पुरवठा पाणी फिल्टर करून करण्यात यावा.
५- एमआयडीसी अंतर्गत सुरक्षा व्यवस्था करणे बाबत.

हयाबाबत एमआयडीसीने पुढील कार्यवाही करावी असे मा. अध्यक्षांनी कार्यकारी अभियंता एमआयडीसी यांना निर्देश दिले.

**कार्यवाही - २. मे.लेबेन लेबॉरेटरीजच्या कर्मचा-यांवर प्राणघातक हल्ला.**
**पोलीस विभाग**

मे. लेबेन लेबॉरेटरीज प्रा. लि. एमआयडीसी अकोला येथील दोन कर्मचा-यांवर प्राण घातक हल्ला झाला असून, हयाबाबत पोलीस विभागाने साधी दखल सुध्दा घेतली नसल्याचे घटकाने कळविले आहे. हयाबाबत मा.अध्यक्षांनी LCB मार्फत अन्वेषण करण्याबाबत पोलीस विभागास सुचना दिल्या.

**कार्यवाही - ३.**
**पोलीस विभाग**

**एमआयडीसी क्षेत्रात कामय स्वरूपी पोलीस चौकी स्थापन करणेबाबत**

अकोला एमआयडीसी क्षेत्रात वाढते चोरीचे प्रमाण, मारहाण व प्राणघातक हल्ले व लूटमार होत असल्याने हया क्षेत्रात दहशतीचे वातावरण निर्माण झ ाले आहे. यावर मा. जिल्हा पोलीस अधिक्षक यांचेशी चर्चा करून तसा अहवाल कार्यकारी अभियंता मऔविमं. यानाी सुचना दिल्या.

**कार्यवाही - ४.**
**मनपा**

**एमआयडीसी फायरस्टेशन उभारणे बाबत**

अकोला एमआयडीसी क्षेत्रात कायमस्वरूपी फायर स्टेशन उभारणे बाबत औद्योगिक संघटनेने मागणी केली आहे. यावर सदर प्रकरणात मुख्याकडून संमती मिळाली असल्याचे संबंधित अधिकारी यांनी सभेत सांगीतले. सदर मुद्दा वगळण्याच्या मा. अध्यक्षांनी सुचना दिल्या.

मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा उद्योग मित्र समिती सभा.

महाव्यस्थापक तथा सदस्य सचिव,
जिल्हा उद्योग मित्र समिती सभा.